Exh. 1/B

दैनिक रजि. नं. /२०२६

दाखल ता.३१/०१/२०२६

किरकोळ अर्ज नं. 24 /२०२६

**मे. जिल्हा न्यायाधिशसो, कोल्हापूर**

**यांचे कोर्टात...**

KAVITA BIPIN AGRAWAL

Digitally signed by KAVITA BIPIN AGRAWAL
Date: 2026.02.09 17:48:05 +0530

१. श्री. आदगोंडा आण्णा पाटील,
व.व. ८२, धंदा:— सुखवस्तु,
रा. १८२५/२६, बी वॉर्ड,
शुक्रवार पेठ, कद्रे गल्ली,
बावडेकर प्लाझा,
प्लॉट नं. १०४, कोल्हापूर

२. सौ. सुनिता आदगोंडा पाटील,
व.व. ५७, धंदा:— घरकाम,
रा. सदर

— अर्जदार

Order
Issue notice to Opponents

विरूध्द

PDJ, Kolhapur
09/02/2026

श्री. अनमोल आदगोंडा पाटील,
व.व. २२, धंदा:— नोकरी,
रा. आलास, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर

— वि.प.

Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

**

## सी. पी. सी. कलम २४ प्रमाणे अर्ज:—

१. दावा मिळकतीचे वर्णन:—

अ) जिल्हा कोल्हापूर, ता. शिरोळ पैकी मौजे आगर गावचे हद्दीतील गट नं. ७९, पैकी बिगर शेती प्लॉट यांचे क्षेत्र हे. ०. ०२—७० आर, याचा आकार रू. ०.०१ पैसे ची मिळकत याची अंदाजे किंमत रूपये ५,००,०००/—

ब) जिल्हा कोल्हापूर, ता. करवीर पैकी मौजे सांगवडे गावचे हद्दीतील खालील मिळकती:—

१) सि.स.नं. ४१३, एकूण क्षेत्र २३३.२० चौ. मी. यापैकी २१६. ६० चौ. मि. मिळकत याची अंदाजे किंमत रू. ४,००,०००/—

२) सि.स.नं. ६१५, एकूण क्षेत्र ३४.० चौ. मी. ची पुरी मिळकत याची अंदाजे किंमत रू. २,००,०००/—

३) सि.स.नं. ४१४ एकूण क्षेत्र ७३३.४० चौ. मी. ची यापैकी १८३.३५ चौ. मि. मिळकत याची अंदाजे किंमत रू. २,००,०००/—

४) सि.स.नं. ४११, एकूण क्षेत्र १२४.७० चौ. मी. ची यापैकी ६२.३५ चौ. मि. मिळकत याची अंदाजे किंमत रू. २,००,०००/—

Sanjeevr
Superintendent(Lit.
District Court,Kolhapur

**

५) सि.स.नं. ६१४, एकूण क्षेत्र १११.३० चौ. मी. यापैकी १८.१ चौ. मि. मिळकत याची अंदाजे किंमत रू. २०,०००/—

६) सि.स.नं. ४१५, एकूण क्षेत्र ६५.०३ चौ. मी. यापैकी ३२.१५ चौ. मि. मिळकत याची अंदाजे किंमत रू. २०,०००/—

७) सि.स.नं. ६१६, एकूण क्षेत्र २०.३० चौ. मी. याची अंदाजे किंमत रू. २०,०००/—

क) जि. कोल्हापूर, ता. करवीर पैकी मौजे सांगवडे गावचे हद्दीतील गट नं. ४९१ एकूण क्षेत्र हे. २.१७ आर यापैकी उत्तर बाजूची पूर्व—पश्चिम चालीची जमीन यांचे क्षेत्र हे. १.०८.५० आर, याचा आकार रू. १२.७५पै ची शेत मिळकत.

ड) जि. कोल्हापूर, ता. करवीर पैकी कोल्हापूर म्युन्सीपल हद्दीतील डी—वॉर्ड मधील नगर भू—मापन कं. १८२५/१/अ, १८२५/१/ब, १८२५/१/क व १८२६ या मिळकतीमध्ये असलेल्या सदनिकेतील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं.२०३ ची मिळकत याचे क्षेत्र ६७.३४ चौ. मी. याची अंदाजे किंमत रू.१०,००,०००/—

येणेप्रमाणे मिळकती असे.

२. वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत यातील वि.प. यांनी अर्जदार यांच्या विरूध्दात मे. सिव्हील जज्ज, सिनीअर डिव्हीजन, जयसिंगपूर यांचे कोर्टात स्पे.क.नं. ४१/२०२५ हा दावा दाखल केलेला आहे.

Superintendent(Lit.)
District Court, Kolhapur

**

सदर दावेतील दावा मिळकत १ अ ही फक्त मिळकत मे. सिव्हील जज्ज, सिनीअर डिव्हीजन, जयसिंगपूर यांचे कार्यक्षेत्रात येते. अन्य सर्व मिळकती म्हणजे जवळ जवळ ९ मिळकती मे. सिव्हील जज्ज सिनीअर डिव्हीजन कोल्हापूर यांचे कार्यक्षेत्रात येतात. असे असताना फक्त प्रतिवादी यांना त्रास व्हावा म्हणून जयसिंगपूर कोर्टामध्ये दावा दाखल केलेला आहे. सदर दावेचा निकाल करणेचे अधिकार मे. कोल्हापूर कोर्टास देखील आहे. या गोष्टीची माहीती वादी यांना आहे. तरीही प्रतिवादी यांना त्रास देणेसाठी मे. जयसिगपूर कोर्टामध्ये दावा दाखल केलेला आहे.

३. यातील अर्जदार क्रं. १ यांचे वय आजरोजी ८२ आहे. सदर अर्जदार यांची बायपास सर्जरी झालेली आहे. तसेच वयाच्या मानाने सर्व स्नायू देखील दुखत आहेत. अशा परिस्थीतीमध्ये प्रवास करणे अडचणीचे आहे. प्रवासामध्ये ऑपरेशनचा त्रास वाढत आहे. यातील अर्जदार क्रं. २ यांचे वय ५७ आहे. त्यांचे देखील ऑपरेशन झालेले आहे. शुगर, बी. पी. चा त्रास आहे. त्यांना देखील हिंडणे फिरणे अशक्य आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता अर्जदार यांना मे. जयसिंगपूर कोर्टामध्ये प्रत्येक तारखेस जाणे—येणे अशक्य झाले आहे. त्यामुळे मे. जयसिंगपूर कोर्टामध्ये असलेला दावा मे. कोल्हापूर कोर्टामध्ये वर्ग व्हावा म्हणून अर्जदार हे अर्ज देत आहेत.

४. **सबब मे. कोर्टास नम्र विनंती की,**

अ. अर्जदार यांचा अर्ज मंजूर करणेत यावा.

ब. मे. सिव्हील जज्ज सिनीअर डिव्हीजन जयसिंगपूर यांच्या कोर्टामध्ये प्रलंबित असलेला स्पे.क.

Superintendent(Lit.)
District Court, Kolhapur

**

नं. ४१ / २०२५ हा दावा मे. सिव्हील जज्ज सिनीअर डिव्हीजन, कोल्हापूर येथे वर्ग करणेत यावा.

येणेप्रमाणे अर्ज असे.

सोबत वकीलपत्र, पत्तामेमो, कामदयादी, यादी सोबत कागद इ. कागद हजर असे.

कोल्हापूर मे. जा. व्हावे.

ता.३१ / ०१ / २०२६

अर्ज तयार करून दाखल करणार अर्जदार नं. १

**ॲड. पी. जे. पोवार** अर्जदार नं. २

<u>**प्रतिज्ञा**</u>

आम्ही यातील अर्जदार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वर नमूद अर्जातील संपूर्ण मजकूर आमचे प्रत्यक्ष माहीती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा.

कोल्हापूर

ता.३१ / ०१ / २०२६ अर्जदार नं. १

अर्जदार नं. २

Superintendent(Lit.)
District Court.Kolhapur

**

## ॲफिडेव्हिट

मी यातील आदगोंडा आण्णा पाटील, व.व. ८२, धंदा:– सुखवस्तु, रा. १८२५/२६, बी वॉर्ड, शुक्रवार पेठ, कद्रे गल्ली, बावडेकर प्लाझा, प्लॉट नं. १०४, कोल्हापूर शपथपूर्वक कथन करतो की, वर नमूद अर्जातील संपूर्ण मजकूर माझे प्रत्यक्ष माहीती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हिट.

कोल्हापूर

ता.३१/०१/२०२६

ॲफिडेव्हिट करणार यांना मी ओळखतो — अर्जदार नं. १

**ॲड. पी. जे. पोवार**

## प्रतिज्ञा

मी यातील आदगोंडा आण्णा पाटील, व.व. ८२, धंदा:– सुखवस्तु, रा. १८२५/२६, बी वॉर्ड, शुक्रवार पेठ, कद्रे गल्ली, बावडेकर प्लाझा, प्लॉट नं. १०४, कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वर नमूद अर्जातील व त्याखालील ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर माझे प्रत्यक्ष माहीती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा.

कोल्हापूर

ता.३१/०१/२०२६ — अर्जदार नं. १

Solemnly affirmed before me by
Shri./Smt. Adagonda Anna Patil
Age 82 Occp. Nil of Kolhapur.
who is identified by Shri P. J. Powar.
..............Adv. whom I Know Personally
Dt. 31/01/2026.

Superintendent(Lit.)
District Court, Kolhapur

**